पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई CB 15/2026

प्रेसनोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक ०२/०२/२०२६ |
|---|---|

## ‘‘नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडुन १८ कोटी ६३ लाखाचे अंमली पदार्थ नष्ट’’

नशा मुक्त नवी मुंबई “अभियानांतर्गत अंमली पदार्थांविरोधात सातत्यपूर्ण, समन्वयित व कठोर कारवाई करत नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने आज एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. नशा मुक्त नवी मुंबई अभियान या कार्यक्रमाअंतर्गत नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडुन दिनांक २६/०९/२०२५ रोजी पर्यंत **११४ गुन्हयांमधील एकुण ३८ कोटी ४५ लाख रुपये किंमतीचे** अंमली पदार्थ नष्ट करण्यात आला होता.

त्याच अभियानाचा पुढील भाग म्हणून आज होळी सणाच्या मुहुर्तावर समाजातील वाईट प्रवृत्तींचे निर्मूलन करण्याच्या उद्देशाने ५५ गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेला **१८ कोटी ६३ लाख ३४ हजार २६५ रुपयांचे किंमतीचे अंमली पदार्थ** शासन मान्य मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनी, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड या ठिकाणी कायदेशीर प्रक्रियेचे पालन करून पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, श्री.प्रशांत मोहिते, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ, सहा.पोलीस आयुक्त, खारघर विभाग, श्री.विक्रम कदम, वपोनि, अंपवि कक्ष, श्री.संदीप निगडे यांचे उपस्थितीत नष्ट करण्यात आला आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये मागील ०३ वर्षामध्ये बेकायदेशीररित्या वास्तव्यास राहून व ड्रग्जची विक्री करणाऱ्या आफ्रिकन नागरिकांविरुध्द कारवाई करून **एकुण १५२९ नागरिकांना हद्दपार करण्यात आले असुन ९११ आफ्रिकन नागरिकांना ब्लॅकलिस्ट करण्यात आले आहे**. वारंवार अंमली पदार्थ विक्रीत सहभागी आढळलेल्या आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच पंजाब राज्यातुन नवी मुंबई येथे येवुन हॉटेल, लॉज, पीजी येथे वास्तव्यास राहून ट्रक व रेल्वेमार्गे हेरॉईन, अफिम यासारख्या अंमली पदार्थाची वाहतुक करून मोठया प्रमाणात विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करुन **०६ गुन्हे दाखल केले. एकुण ३३ आरोपींना अटक केली. अटक आरोपींकडून ०४ कोटी २० लाख रूपये** किंमतीचा हेरॉईन, अफिम, मेफेड्रॉन व कोडाईन बॉटल असा अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आला आहे. **सदर गुन्हयातील मुख्य सूत्रधार आरोपी साहीबसिंग जोगिंदरसिंग उर्फ सबा, रा.अमृतसर, पंजाब यास पंजाब येथून अटक करण्यात आली आहे.**

अंमली पदार्थाविरोधातील कारवाई अधिक प्रभावी, जलद व स्थानिक पातळीवर परिणामकारक व्हावी यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र **‘‘ॲन्टी नार्कोटिक स्क्वॉड’’** (ANS) स्थापन करण्यात आलेले आहेत. स्थानिक माहिती संकलन व गुप्त बातमीदार जाळे बळकट करणे, शाळा, महाविद्यालये, हॉटेल, लॉज, पब, बार व संवेदनशील भागांमध्ये नियमित तपासणी व गस्त, नव्याने उद्भवणाऱ्या ड्रग टेंड्र्सवर लक्ष ठेवणे व तात्काळ कारवाई, एनडीपीएस कायद्यांतर्गत प्रकरणांची शास्त्रशुद्ध तपासणी व दोषारोपपत्र सादर करणे ही या स्क्वॉडची प्रमुख वैशिष्टये आहेत.

शासनाच्या धोरणानुसार अंमली पदार्थविरोधातील कारवाई अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये **‘‘नशा मुक्त नवी मुंबई’’** अभियानाची सुरूवात करण्यात आली आहे. सदर अभियानाच्या अनुषंगाने शहरातील शाळा, कॉलेज, सोसायटया व सार्वजनिक ठिकाणी व्यापक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. नागरिकांकडुन अंमली पदार्थाविषयी माहिती मिळावी यासाठी **८८२८—११२—११२**

हा हेल्पलाईन नंबर सुरू करण्यात आलेला आहे. नागरिक कोणतीही माहिती पूर्णपणे गोपनीय (गुप्त) स्वरूपात देऊ शकतात. माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख गोपनीय राखण्यात येईल, याची हमी देण्यात आली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत अंमली पदार्थांविरोधातील कारवाई भविष्यातही अधिक तीव्र, कायदेशीर व समन्वयित पद्धतीने सुरू ठेवण्यात येणार असून, नागरिकांनी निर्भयपणे व गोपनीयतेने माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

★★★★★★★★★★